मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रचारासाठी मिळणार केवळ 11 दिवस!

## उमेदवारांची कसोटी; कमी वेळेत मतदारांपर्यंत पोहोचणे हेच मोठे आव्हान

**पिंपरी | प्रतिनीधी**

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी निश्चित झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रचारासाठी उमेदवारांना केवळ ११ दिवसांचा अल्प कालावधी मिळणार आहे. एका प्रभागात तब्बल ४० ते ७५ हजार मतदारसंख्या असताना इतक्या कमी वेळेत मतदारांपर्यंत पोहोचणे हेच मोठे आव्हान ठरणार आहे.

त्यामुळे इच्छुक उमेदवारांसह सर्वच राजकीय पक्षांची धावपळ सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवारपासून (दि.२३) सुरू होणार असून, त्याआधीच संभाव्य उमेदवारांनी तयारीला वेग दिला आहे. तिकीट मिळताच प्रचार सुरू करता यावा, यासाठी प्रभागनिहाय संपर्क यादी, बूथनिहाय कार्यकर्ते, गाठीभेटींचे नियोजन आणि प्रचार साहित्याची पूर्वतयारी केली जात आहे.



### उमेदवारांची कसोटी..

» कमी कालावधीत मतदारांशी थेट संवाद साधणे, स्थानिक प्रश्नांवर स्वतःची आणि पक्षाची भूमिका स्पष्ट करणे ही मोठी कसोटी ठरणार आहे. इच्छुक उमेदवारांची नाराजी, तिकीट वाटपातील गणिते आणि मर्यादित प्रचार कालावधी या सगळ्यांचा सामना करताना राजकीय पक्षांची रणनीती किती प्रभावी ठरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उमेदवारी जाहीर होताच प्रचाराला पूर्ण ताकदीने सुरुवात करण्याची तयारी अनेकांनी केली आहे.

विशेषतः कमी कालावधीत पक्षाचे चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना करण्यात येत आहे.

मोठ्या प्रभागात प्रत्यक्ष घराघरात पोहोचण्यासाठी वेळ अपुरा असल्याने प्रचाराच्या पद्धतींमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. पदयात्रा, कोपरा सभा, छोट्या बैठका, सोशल मीडियाचा प्रभावी वापर, मोबाइल प्रचार वाहनांद्वारे प्रचार यावर भर दिला जाणार आहे. अनेक पक्षांनी आधीच अनौपचारिक जनसंपर्क सुरू ठेवला आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांसाठी भाजपा सज्ज!

## संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचा सविस्तर अहवाल लवकरच प्रदेश कार्यालयाकडे सादर केला जाणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी केली असून त्याचाच एक भाग म्हणजे शहरातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती मोरवाडी येथील पक्ष कार्यालयात नुकत्याच पार पडल्या. इच्छुक उमेदवारांकडून आलेल्या विक्रमी प्रतिसादामुळे भाजपची शहरातील ताकद आणि जनतेचा विश्वास स्पष्टपणे दिसून आला असल्याचे पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

पिंपरी मोरवाडी येथील भाजपा पक्ष कार्यालयामध्ये शहरातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती 16 आणि 17 डिसेंबर रोजी संपन्न झाल्या. तब्बल 730 अर्ज इच्छुक उमेदवाराकडून पक्षाकडे सादर करण्यात आले होते. या सर्व इच्छुक उमेदवारांची मुलाखत पक्षाचे निवडणूक प्रमुख शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, विधानपरिषद आमदार अमित गोरखे आणि उमा खापरे यांच्या उपस्थितीत घेण्यात आले. महापालिका निवडणुकीसाठी तब्बल सातशेहून अधिक उमेदवारांनी उमेदवारीची मागणी केल्यामुळे भाजपमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

या मुलाखत प्रक्रियेबाबत सांगताना निवडणूक प्रमुख शंकर जगताप म्हणाले मुलाखती दरम्यान प्रत्येक इच्छुक उमेदवाराची वैयक्तिक ओळख , संबंधित प्रभागातील सद्यस्थिती,



सामाजिक काम, संघटनात्मक अनुभव आणि राजकीय वाटचाल यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पक्षाने नेहमीच पारदर्शक प्रक्रिया आणि सक्षम नेतृत्वाला प्राधान्य दिले आहे. याबाबतचे स्पष्ट निकषच पक्षाने ठरवलेले आहेत आणि याच निकषांच्या आधारे उमेदवारांची निवड केली जाणार आहे.

पिंपरी चिंचवड शहर गेल्या दहा वर्षात विकासाच्या वेगाने धावत आहे. औद्योगिक शहर ते मेट्रोसिटी ही शहराची विकासाची घोडदौड कायम ठेवण्यासाठी दिल्ली ते गल्ली एक पक्ष काम करत असल्यास वेगाने प्रगती होईल हे गेल्या दहा वर्षात आपण पाहिले आहे. त्यामुळे "भाजपच्या माध्यमातून शहराची प्रगती" हेच

> “ या संपूर्ण मुलाखत प्रक्रियेचा सविस्तर अहवाल लवकरच प्रदेश कार्यालयाकडे सादर केला जाणार आहे. त्यानंतर उमेदवारी वाटपाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष श्री रविंद्र चव्हाण यांच्या सक्षम नेतृत्वाखाली महाराष्ट्रात भाजपचे संघटन कार्य वेगाने सुरू आहे. प्रत्येक निष्ठावंत कार्यकर्ता आणि इच्छुक उमेदवाराच्या पाठीशी पक्ष ठामपणे उभा आहे. या मुलाखतीमधून इच्छुक उमेदवारांचे सखोल मूल्यांकन आणि सर्वेक्षण केले जाईल. त्यानंतरच पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाला गती देणाऱ्या उमेदवारांबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार तथा निवडणूक प्रमुख, पिंपरी चिंचवड शहर.**

गणित उमेदवार आणि मतदारांनी ठरवले आहे असा विश्वास देखील शंकर जगताप यांनी व्यक्त केला आहे. मुलाखती दरम्यान शहरातील अनेक नामवंत व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी ही उमेदवारी अर्ज दाखल केलेला होता आणि मुलाखतीसाठी उपस्थिती लावली होती. त्यामुळे संपूर्ण शहरातील वातावरण हे भाजपच्या बाजूने आहे. यातून उत्साह चैतन्य आणि सकारात्मकतेची लाट जाणवत आहे असे देखील शंकर जगताप यावेळी म्हणाले.

# पिंपळे निलखमध्ये कचऱ्यात स्त्री जातीचे अर्भक आढळले

## आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर; मार्गदर्शक सूचनांनुसार मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पिंपळे निलख येथे एका अज्ञात व्यक्तीने कचऱ्यात नवजात बाळाला फेकून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनं परिसरातून मोठा संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार हे अर्भक स्त्री जातीचे असल्याचे समोर आले आहे. स्थानिक नागरिकांच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.



या घटनेची माहिती मिळताच पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. मात्र, दुर्दैवाने या चिमुकलीचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी पाठवण्यात आला असून, या अमानवी कृत्यामागे कोण आहे याचा शोध पोलीस घेत आहेत.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पोलीस सर्व शक्यता तपासून गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रयत्न करत आहेत.

# महापालिकेची सर्व प्रशासकीय यंत्रणा निवडणूकीसाठी सज्ज

## निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर; मार्गदर्शक सूचनांनुसार मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, भयमुक्त आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, निवडणुकीचा प्रत्येक टप्पा अचूकपणे पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि तांत्रिक सुविधांचे चोखपणे नियोजन केले आहे.शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, यासाठी पोलीस प्रशासन आणि महापालिका यंत्रणेमध्ये समन्वय ठेवण्यात आला आहे.तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीपासून ते भरारी पथकांच्या तैनातीपर्यंतची सर्व तयारी पूर्ण झाली असून, लोकशाहीचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन पूर्ण क्षमतेने सज्ज झाले आहे,अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.





माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार पिंपरी चिंचवड महापालिकेची अंतिम प्रभाग रचना ६ ऑक्टोबर २०२५ रोजी अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात आली होती. शहरात एकूण ३२ प्रभाग असून प्रत्येक प्रभागात ४ सदस्य याप्रमाणे एकूण १२८ सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ५० टक्के म्हणजेच ६४ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार महापालिका क्षेत्रातील एकूण लोकसंख्या १७ लाख २७ हजार ६९२ एवढी आहे. त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या २ लाख ७३ हजार ८१० असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या ३६ हजार ५३५ इतकी आहे. यानुसार अनुसूचित जातीसाठी २० जागा (पैकी १० महिला राखीव), अनुसूचित जमातीसाठी ३ जागा (पैकी २ महिला राखीव) आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४ जागा (पैकी १७ महिला राखीव) निश्चित करण्यात आल्या आहेत.

महापालिका क्षेत्रातील एकूण मतदार संख्या १७ लाख १३ हजार ८९१ इतकी असून यामध्ये ९ लाख ५ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ स्त्रिया आणि १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, प्रभाग क्रमांक १६ हा ७५ हजार १०५ मतदारांसह सर्वाधिक मतदारांचा प्रभाग ठरला आहे, तर प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्वात कमी म्हणजे ३३ हजार ३३ मतदार आहेत. मतदारांच्या सोयीसाठी एकूण २ हजार ३४ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, या केंद्रांची अधिकृत यादी २० डिसेंबर रोजी आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

निवडणूक कामकाजासाठी प्रशासनाने ८ क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून भक्कम यंत्रणा उभी केली आहे. एकूण ८ निवडणूक निर्णय अधिकारी आणि २४ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेकरिता ८ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सुमारे १४ हजार अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. महापालिका क्षेत्रासाठी आचारसंहिता पथक प्रमुख आणि उमेदवारांचे हिशोब तपासणी पथक प्रमुख यांचीही स्वतंत्रपणे नेमणूक करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली असून, यामध्ये पोलीस आयुक्त व महापालिका अतिरिक्त आयुक्त यांचा समावेश आहे. याशिवाय, मतदान प्रक्रियेसाठी ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय प्रत्येक मतदान केंद्रावर १ केंद्रध्यक्ष, ३ मतदार अधिकारी, १ शिपाई (१० टक्के राखीव कर्मचारी) असे एकूण अंदाजे २०५० मतदान केंद्रांवर सुमारे १० हजार २५० अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत.

निवडणुकीच्या काळात होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी देखील आवश्यक बंदोबस्त करण्यात आला आहे. प्रचार फेऱ्या, सभा आणि अवाजवी खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावर व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथके काम करतील. मतदारांवर प्रभाव टाकणे, प्रलोभन दाखवणे तसेच पैसे व मद्याची अवैध वाहतूक किंवा संशयास्पद हालचालींवर नजर ठेवण्यासाठी भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच शहराच्या विविध नाक्यांवर शस्त्रास्त्रे व अवैध वस्तूंच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी चेक पोस्ट पथके कार्यरत राहतील. आचारसंहिता भंगाची कोणतीही तक्रार आल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी महापालिका व प्रभाग स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी आणि मतदानाची टक्केवारी उंचावण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत (SVEEP) व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे शहरातील तरुण मतदार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले जात आहे.

उमेदवारांना थकबाकी नसल्याचा दाखला मिळवण्यासाठी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवार हे प्रमाणपत्र डाऊनलोड करू शकतील. तसेच मतदारांना आपले नाव शोधणे सुलभ व्हावे यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या MAHASECVOTERLIST.IN या अधिकृत संकेतस्थळावर 'SEARCH NAME IN VOTER LIST' ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे मतदारांना आपले नाव योग्य प्रभागात आहे की नाही हे तपासणे सोपे होईल, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी हर्डीकर यांनी दिली, तसेच शहरातील सर्व नागरिक, उमेदवार आणि राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

# पुणे महापालिका निवडणुकीचा बिगुल; उमेदवारांसाठी ऑनलाईन एनओसी, खर्चमर्यादा 15 लाख

## पहिल्यांदाच 24 तासांत ना हरकत प्रमाणपत्र; मतदान, सीसीटीव्ही व ईव्हीएमबाबत महत्त्वाची तयारी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. पुढील महिन्यात 15 तारखेला या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका घेण्यासाठी महापालिकेच्या निवडणूक यंत्रणेने तयारीला सुरुवात केली आहे. उमेदवारांना खर्चाची मर्यादा 15 लाख असून, या खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात आली आहे. तसेच उमेदवारी अर्ज भरताना ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असते. हे पत्र देण्यासाठी यंदा पहिल्यांदाच ऑनलाइन यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली असून, आवश्यक कागदपत्रे व थकबाकी भरून 24 तासांच्या आत इच्छुकांना हे प्रमाणपत्र मिळवता येणार असल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

पुण्यासह राज्यातील तब्बल 29 महानगरपालिकांच्या रखडलेल्या निवडणुकांचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्याने पुणे महापालिकेच्या निवडणुकीचे बिगुल अखेर वाजले आहे. 15 जानेवारी रोजी मतदान, तर 16 जानेवारी रोजी मतमोजणी व अंतिम निकाल जाहीर होणार आहेत.



### कागदपत्रांसाठी एक खिडकी यंत्रणा

» निवडणूकप्रक्रियेत अनेक कागदपत्रांची गरज असते. ही कागद पत्रे तातडीने मिळावी यासाठी एक खिडकी यंत्रणा तयार करण्यात आली आहे. कागदपत्रे मिळवताना अनेकांची दमछाक होत असते. मात्र, सर्व कागदपत्रे एकाच ठिकाणी देण्यासाठी एकाच ठिकाणी यंत्रणा उभारण्यात आली आहे.

यासंदर्भात पुणे महापलिकेच्या निवडणूक यंत्रणेने काय तयारी केली आहे, याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी माध्यमांना मंगळवारी दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, निवडणूक अधिकारी व उपयुक्त प्रसाद काटकर, उपयुक्त रवी पवार उपस्थित होते.

आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे यासाठी निवडणूक संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत पोलिस आयुक्त, महापालिका आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचा समावेश करण्यात आला आहे. निवडणूक काळात घडणाऱ्या महत्त्वाच्या घटना, प्रचारफेऱ्या, सभा तसेच उमेदवारांच्या खर्चाबाबत व्हिडीओग्राफी सर्व्हेलन्स पथक तयार करण्यात आले आहे. तसेच भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. मतदारांना प्रलोभने किंवा प्रभाव पाडणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी चेक पोस्ट पथक तयार करण्यात आले आहे. तर तक्रारींचे निवारण करण्यासाठी देखील महापालिकास्तरावर किंवा प्रभागनिहायस्तरावर आचारसंहिताभंगांच्या तक्रार निवारणासाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे उमेदवारांना उमेदवारी अर्ज दाखल करताना स्वच्छतागृह वापरण्याचे प्रमाणपत्र, थकबाकी नसल्याचा दाखला व इतर काही ना हरकत प्रमाणपत्राची (एनओसी) गरजेची असते. ते लवकर मिळण्यासाठी पहिल्यांदाच ऑनलाइन सोय उपलब्ध आहे. वरील दाखले मिळवण्यासाठी अर्ज करताना आधार कार्ड, मतदार व प्रॉपर्टी नंबर HTTPS://NOCELECTION.PMC.GOV.IN/ या संकेतस्थळावर अपलोड करावे लागणार आहे. त्यानंतर महापालिकेच्या सर्व विभागांत ऑनलाइन पद्धतीने कुठल्या विभागाची थकबाकी नसल्याची पडताळणी करण्यात येईल. जर थकबाकी असेल तर उमेदवारला थकबाकी भरावी लागणार आहे.

### मतदानवाढीसाठी करणार प्रयत्न

» निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार मतदानवाढीसाठी मतदान जनजागृती कार्यक्रम राबवण्यात येईल. गेल्या निवडणूकीत 55 टक्के मतदान झाले होते. यात वाढ करण्यासाठी आमचे प्रयत्न राहणार आहेत. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आम्ही त्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे आयुक्त राम म्हणाले.

### संवेदनशील केंद्रावर सीसीटीव्हीची नजर

» पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी तब्बल 4 हजार मतदान केंद्र उभारले जाणार आहेत. यातील किती केंद्र संवेनशील आहेत ? याबाबत पोलिस आयुक्त यांच्याशी बैठीक घेऊन त्यांच्याकडून यादी आल्यावर त्या ठिकाणी राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार सीसीटीव्ही बसवण्यात येईल. साधारणत: 10 टक्के संवेनदशील मतदान केंद्र असू शकतात, असे आयुक्त राम यांनी सांगितले.

---

# पुणे बार असोसिएशनमध्ये महिला आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय

## दर तीन वर्षांनी अध्यक्षपद महिलांसाठी राखीव; वकीलवर्गात आनंदाचे वातावरण

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनच्या अध्यक्षपदासह उर्वरित जागांसाठी महिला आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. मंगळवारी (दि. 16) झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दर तीन वर्षांनी अध्यक्षपद महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात येणार आहे. उपाध्यक्ष, सचिव आणि ऑडिटर या पदांसाठी एक जागा वाढवून ती महिलांसाठी राखीव असेल. कार्यकारिणी सदस्यसंख्या वाढून त्यामध्ये पाच जागा महिलांसाठी राखीव असतील, असा ठराव करण्यात आला. तो मंजूर होताच महिला वकीलवर्गाने गुलाल उधळून पेढे भरवत आनंद व्यक्त केला.



पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सायंकाळी चारच्या सुमारास ही सभा पार पडली. शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील अशोका सभागृहात पार पडलेल्या सभेवेळी उपाध्यक्ष समीर भुंडे, सुरेखा भोसले, सचिव पृथ्वीराज थोरात, भाग्यश्री गुजर-मुळे, सदस्या माधवी पवार, प्रसाद निगडे यांसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी ज्येष्ठ वकील ॲड. डॉ. सुधाकर आव्हाड, राज्य वकील परिषदेचे सदस्य ॲड. राजेंद्र उमाप, सदस्य ॲड. हर्षद निंबाळकर, ॲड. के. टी. आरू, ॲड. मंगेश लेंडघर, ॲड. राणी कांबळे-सोनावणे, ॲड. शिरीष शिंदे, ॲड. रवींद्र शिंदे, ॲड. विजयसिंह निकम यांसह अन्य वकिलांनी मनोगत व्यक्त केले. महिला वकिलांच्या आरक्षणासह बारकडील तीन कोटींच्या ठेवींवरील व्याजातून वकिलांच्या हितासंबंधी कामे व्हावीत, धर्मादाय आयुक्त कार्यालयातील बारसंबंधित प्रकरणे तडजोडीतून मिटवावीत, न्यायालय आवारातील नियोजित नवीन इमारतीत असोसिएशनसाठी 14 ते 15 हजार चौरस फूट जागा मिळविण्यासाठी प्रयत्न व्हावे, काही वर्षांपूर्वी पाचशे रुपये फी भरून सभासद फी घेतली होती, त्यांच्याकडे उर्वरित फी भरण्याची विनंती करून आजीव सभासद करून घ्यावे आदी गोष्टींवर एकमताने ठराव करण्यात आला.

> पुणे बार असोसिएशनने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक आहे. तो समताधिष्ठित आणि दूरदृष्टीचा आहे. महिलांचा कायदे क्षेत्रातील वाढता सहभाग लक्षात घेता त्यांना नेतृत्वाच्या संधी देणे आवश्यक होते. दर तीन वर्षांनी अध्यक्षपद महिलांसाठी राखीव ठेवण्याचा ठराव हा केवळ आरक्षणापुरता मर्यादित नसून, सक्षम नेतृत्व घडविण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. या निर्णयामुळे असोसिएशन अधिक समावेशक, बळकट आणि प्रगत होईल, असा मला विश्वास आहे.
>
> - ॲड. हेमंत झंजाड, अध्यक्ष, पुणे बार असोसिएशन

# बिबट्या नरभक्षक होता का? वनविभागाच्या दाव्यांवर संशय

## नव्या घटनेमुळे वनविभागाच्या आधीच्या दाव्यांबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पारगाव मंगरूळ परिसरात कांदा काढणीसाठी आलेल्या बाहेरगावच्या मजुरांचा रोहित बाबू कापरे (वय ८) या बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याने पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.त्यामुळे बिबट्या नरभक्षक कोणता या चर्चेला उधाण आले आहे. यापूर्वी पिंपरखेड येथे मारलेला बिबट्या नरभक्षक होता का? वनविभागाच्या दाव्यांवर संशय, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

पिंपरखेड येथे सुमारे एक महिन्यापूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात रोहन बोंबे या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.या घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी त्याच परिसरात शार्प शुटरच्या मदतीने नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात आल्याचा दावा वनविभागाने केला होता. त्यानंतर परिसरात काही काळ वातावरण शांत झाले होते. मात्र, सोमवार दि.१५ रोजी पारगाव मंगरूळ परिसरात कांदा काढणीसाठी आलेल्या बाहेरगावच्या मजुरांचा रोहित बाबू कापरे (वय ८) या बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याने पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

त्यामुळे बिबट्या नरभक्षक कोणता या चर्चेला उधाण आले आहे. या नव्या घटनेमुळे वनविभागाच्या आधीच्या दाव्यांबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.वनविभागाने सांगितलेला बिबट्या खरोखरच नरभक्षक होता का, असा थेट सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.नागरिकांमध्ये अशी चर्चा रंगली आहे की, लोकांचा संताप शांत करण्यासाठी कोणत्याही बिबट्याला ठार करून त्यालाच नरभक्षक घोषित करण्यात आले का? जर खरोखरच नरभक्षक बिबट्याला ठार मारण्यात आले असेल, तर रोहित कापरे या बालकावर हल्ला करणारा बिबट्या पुन्हा नरभक्षकच आहे का, की परिसरात एकाहून अधिक धोकादायक बिबट्यांचा वावर आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पारगाव मंगरूळ परिसरात कांदा काढणीसाठी आलेल्या बाहेरगावच्या मजुरांचा रोहित बाबू कापरे (वय ८) या बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याने पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. त्यामुळे बिबट्या नरभक्षक कोणता या चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर वनविभागाच्या एकूणच कार्यपद्धतीवर संशयाचे ढग दाटले असून, ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.वारंवार मानवी जीव जात असताना ठोस उपाययोजना का होत नाहीत, बिबट्यांची संख्या, हालचाली आणि नेमका धोका याबाबत पारदर्शक माहिती का दिली जात नाही, अशी विचारणा केली जात आहे. नागरिकांनी तातडीने सखोल तपास, प्रभावी बंदोबस्त आणि जबाबदार अधिकाऱ्यांकडून स्पष्ट खुलासा करण्याची मागणी केली आहे.



### प्रभावी बंदोबस्त करण्याची मागणी

» या पार्श्वभूमीवर वनविभागाच्या एकूणच कार्यपद्धतीवर संशयाचे ढग दाटले असून, ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.वारंवार मानवी जीव जात असताना ठोस उपाययोजना का होत नाहीत, बिबट्यांची संख्या, हालचाली आणि नेमका धोका याबाबत पारदर्शक माहिती का दिली जात नाही, अशी विचारणा केली जात आहे. नागरिकांनी तातडीने सखोल तपास, प्रभावी बंदोबस्त आणि जबाबदार अधिकाऱ्यांकडून स्पष्ट खुलासा करण्याची मागणी केली आहे.

### संभ्रम...

» पिंपरखेड येथे एक महिन्यापूर्वी बिबट्याने बालकाला ठार केल्यानंतर शार्प शूटरकडून नरभक्षक बिबट्या ठार केले. आणि तेथून अवघ्या अडीचशे मीटर अंतरावर असलेल्या पारगाव येथील बालकाला सोमवारी सकाळी बिबट्याने ठार केले. त्यामुळे पूर्व मारलेला बिबट्या नरभक्षक बिबट्या होता का ? याबाबत संभ्रम आहे.

“ नरभक्षक बिबट्याने आपले लक्ष्य बालकांकडे वळवल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शाळेत मुलांना पाठवायचे की नाही यापर्यंत या विचारापर्यंत पालक आल्यामुळे भविष्यात शिक्षण व्यवस्था ही धोक्यात येण्याची शक्यता आहे. यासाठी वन विभागाने ठोस उपाययोजना करून बिबट्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे बनले आहे.प्रत्यक्ष कृतीवर भर देऊन नागरिकांना दिलासा दिला पाहिजे.

- राधेश्याम शिंदे,उद्योजक, अवसरी खुर्द.

# खेड तालुक्यासह पुणे जिल्ह्यात महसूल यंत्रणा ठप्प

## महसूल अधिका-यांच्या निलंबनाविरोधात महसूल कर्मचा-यांनी राज्यभर कामबंद आंदोलन सुरु केले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महसूल अधिकाऱ्यांच्या निलंबनाविरोधात महसूल कर्मचा-यांनी राज्यभर कामबंद आंदोलन सुरु केले आह. खेड तालुक्यासह पुणे जिल्ह्यात महसूल यंत्रणा यामुळे ठप्प झाली आहे.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात 12 डिसेंबर रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मावळ तालुक्यातील गौण खनिज उत्खनन प्रकरणी गंभीर दखल घेत 4 तहसीलदार, 4 मंडळ अधिकारी आणि 2 ग्राम महसूल अधिकारी अशा एकूण 10 अधिकाऱ्यांवर ठपका ठेवत निलंबनाची कारवाई केली. या निर्णयामुळे संपूर्ण राज्यातील महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. ही निलंबनाची कारवाई मागे घेण्यात यावी, या मागणीसाठी महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी संघटनांनी 15 डिसेंबरपासून सामूहिक रजेवर जाऊन कामबंद आंदोलन पुकारले आहे. याचा थेट परिणाम राज्यातील महसूल यंत्रणेवर झाला असून अनेक ठिकाणी कामकाज पूर्णतः ठप्प झाले आहे.

खेड तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांनी राजगुरुनगर येथील तहसीलदार कार्यालयात एकत्र येत जोरदार एल्गार पुकारला. यावेळी त्यांनी आपल्या डीएससी (डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र) पेनड्राइव्ह तहसीलदार कार्यालयात जमा करून कामबंद आंदोलन सुरू केले. पुणे जिल्ह्यातील प्रांत अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयात एकत्र येत निवेदन सादर करून या आंदोलनात सहभाग नोंदवला.

त्यामुळे जिल्ह्यासह तालुक्यातील महसूल यंत्रणा अक्षरशः कोलमडून पडली आहे.या आंदोलनात तहसीलदार, नायब तहसीलदार, महसूल कर्मचारी, मंडळ अधिकारी, महसूल सेवक तसेच वाहनचालक संघटना एकाच वेळी सहभागी झाल्याने प्रांत कार्यालये व तहसीलदार कार्यालयांतील संपूर्ण कामकाज ठप्प झाले आहे. महसूल विभागातील या अभूतपूर्व आंदोलनामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन कामांवर मोठा परिणाम होत असून शासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. खेड तहसीलदार व प्रांत कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला आहे.



### लोकशाहीदिन रद्द करण्याची वेळ

» याच पार्श्वभूमीवर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी होणारा लोकशाही दिन मंगळवार, 15 डिसेंबर रोजी प्रांत व तहसीलदार उपस्थित नसल्याने रद्द झाला. तक्रारी घेऊन आलेले नागरिक निराश होऊन माघारी परतले. निलंबित करण्यात आलेल्या 10 अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील कारवाई मागे घेतली जात नाही, तोपर्यंत सामूहिक रजेवर जाऊन कामबंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार करण्यात आला आहे.